# लोकोत्तर विभूती : संत निवृत्तिनाथ

**प्रा. डॉ. वसंत रघुनाथ शेंडगे**
MA,SET,NET, Ph.D
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
शेवगाव जि. अहमदनगर, [महाराष्ट्र] भारत.

*समाजाची आत्मिक धारणाच जेव्हा उध्वस्त होते, तेव्हा नव्या वाटा चोखळल्या जातात. लोकोत्तर विभूतीमत्त्वाचे संत निवृत्तिनाथ आणि त्यांची नाथपरंपरा यांनी लोकोध्दाराच्या नव्या वाटा चोखाळल्या. शिवभक्तीला कृष्णभक्तीची जोड दिली आणि वारकरी पंथाचा श्रीविठ्ठल समन्वयवादाचे तत्त्व बनला. ब्रह्मज्ञान कोणाची मक्तेदारी राहिली नाही. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि धार्मिक जीवनात ऐक्यभाव, सामरस्य, आले. जातिसंस्थेचा चिवटपणा आणि पढिक पांडित्याच्या शृंखला गळाल्या. श्रीगुरु निवृत्तिनाथांच्या कृपेने ज्ञानदेव क्रांतिदर्शी कवी तर झालेच पण एक युगपुरुष, तत्त्वदर्शी क्रांतीकारक संत म्हणून दिशादर्शक ठरले आहेत.*

***'अल्लख निरंजन'-------------'अल्लख निरंजन'*** वरकरणी कठोर आणि पहाडी दिसणाऱ्या युगंधर महापुरुषाच्या पवित्र-मंगल मुखराऊळातून ***'दिव्यानंद'*** देणारी अमृतवाणी श्री.गोविंदपंत आणि निराबाईंच्या थकलेल्या कानावर आली आणि हातात अन्नाचे ताट घेवून दोघेही बाहेर आले...

"अंगणातील द्वारापाशी एक नाथपंथीय साधूपुरुष उभा, जटा डोक्यावर बांधलेल्या, त्याला रुद्राक्ष माळा बांधलेल्या, भव्य कपाळ, टपोरे डोळे, धारदार नाक, मिशांमुळे ओठ दिसत नव्हते, दाढी छातीपर्यंत रुळत होती, गोरावर्ण, गळ्यात-दंडाला-मनगटावर रुद्राक्ष माळा, हातात कमंडलू-दुसऱ्या हातात दंड, खांद्याला झोळी, कमरेला भगवे वस्त्र, पायात खडवा"[०१] श्रीगुरु गहिनिनाथांची ही पावनमूर्ती. महद्भाग्याने दाराशी उभी, कृपांकित नजरेने श्रीगोविदपंत व निराबाईंना न्याहाळीतच झोळीतून चिमूटभर भस्म काढीत उद्गारली.

***'गोविंदपंत ! भस्म माताजी को खिलाना |***
***आपके बेटेके | बेटोंकी बहुत कीर्ति होगी |'***
***'अल्लख निरंजन-----------'*** [०२]

श्री विठ्ठलपंत कुलकर्णी म्हणजे श्रीगुरुगहिनिनाथांचा महाप्रसादच ! या उभयतांच्या पोटी जन्माला आला आणि पुढे श्री विठ्ठलपंताच्या पोटी श्रीनिवृत्ती, श्री ज्ञानदेव, श्री सोपानदेव आणि चिद्शक्ती मुक्ताबाईचे अवतार कार्य सुरु झाले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातले हेच एक नवल ! कारण ***'मूर्तिमंत डोळस वैराग्य'*** असे श्री विठ्ठलपंत शास्त्राध्ययनानंतर तीर्थयात्रा करीत स्वप्नीच्या आदेशाने आळंदीला सिध्दोपंत कुलकर्ण्याच्या रुक्मिणीशी विवाहबध्द झाले. हरिकथाश्रवण, संतदर्शन, तीर्थयात्राभ्रमण यात ***'एकाएकी सुखरुप'*** होणारे श्री.विठ्ठलपंत ***' संसाराची नाही चिंता'*** या वृत्तीने संसारात वावरले आणि एक दिवस विरक्तीची उर्मी अनावर झाली तसे काशीच्या कोणा श्रीपादस्वामीकडून

सन्यासदीक्षा घेऊन मोकळे झाले. ***'अविधीकर्माचे न धरावे भय'*** अशा श्रीगुरुच्या आदेशाने पुनःश्च गृहास्थाश्रमाचा स्वीकार करुन ***'सुखरुप स्वधर्म चालवावा'*** या आदेशारुपवाणीमुळे पुन्हा नव्याने संसार !![०३] शके ११९५ पासून दोन दोन वर्षाच्या अंतराने निवृत्तिनाथादि चार मुक्तयुगपुरुषांचा जन्म झाला.

- **निवृत्ती नाम गुण विशेषत्त्व-**

**१) निवृत्ती :-** सर्व प्रकारच्या विचार-विकल्पनांचा अभाव घडून येणे म्हणजेच निवृत्ती. मनाच्या या अलौकिक निःशब्द अवस्थेचे अत्यंत सुंदर वर्णन ***'अमृतानुभव'*** ग्रंथात दिसते.

**२) ज्ञानदेव :-** निवृत्तीच्या या अवस्थेमध्ये मन निःस्तब्ध असले म्हणजे दिव्य प्रज्ञेची वा दिव्य प्रकाशाची जी अवस्था प्राप्त होते तिचे नाव ***'ज्ञान'***

**३) सोपान :-** मनाच्या निःशब्द अवस्थेतून दिव्य प्रज्ञेची-प्रकाशाची अवस्था पार करुन अधिक वर जाण्यासाठी जी शिडी लागते तिचे नाव ***'सोपान'***

**४) मुक्ता :-** अधिक वर जाण्याच्या शिडीच्या साहयाने वर जाता-जाता जेथे हा प्रवास संपतो त्याचे नाव ***'मुक्ती'*** म्हणजे कालात्मक परंपरेची सारी बंधने गळून पडल्यानंतरची ही अद्भूत स्थिती.

श्री.विठ्ठलपंतांच्या निष्कलंक व वास्तव स्वरुपात ज्या अवस्थांचे दर्शन त्यांना घडले त्याच अवस्थांना त्यांनी ही नावे दिली, अर्थात ते काही विकल्पित असे तत्त्वज्ञान नव्हे किंवा ही एखादी गहनगुढे अशी वैचारिकता ही नव्हे, हे म्हणजे क्षणाक्षणाला अत्यंत उत्कट असे जीवन जगत राहणे होय. स्वयंप्रभ अशा सत्याचा शोध करण्यासाठी, दररोज क्षणाक्षणाला जे जीवन जगले जाते, त्यातून सत्याचे जे स्पंदन होत असते, त्याचे तरल व उत्कट अवधान सतत कायम राहिले, तरच या चार आध्यात्मिक अवस्थाचे दर्शन घडते.

- **श्री.निवृत्तिनाथ : अविनाश अव्यक्त जुनाट :-**

समाजाच्या उपेक्षेच्या रणरणत्या उन्हात वाढलेली श्रीनिवृत्तिनाथादि मुले. आरुढ पतितत्वाचे पातक अंगी चिकटलेल्या विठ्ठलपंतांना समाजाने वाळीत टाकले होते. बाराघरची बारातोंडे बारातऱ्हांनी बोलत होती. थोरला निवृत्ती चिंताक्रांत नजरेने हे सर्व पाहतच होता. मुले उपनयन-संस्कारास योग्य झाली तेव्हा ***'क्षमा अपराध करा दीना'*** अशा आर्त वाणीने अंतर्बाह्य पोळलेले विठ्ठलपंत आळंदीकर ब्रह्मवृदांस शरण गेलेले निवृत्तिनाथाने पाहिले होते. देहान्त प्रायाश्चित्ताचा मिळालेला निर्णय शिरोधार्य मानून उभयता पतिपत्नींनी प्रयागाच्या त्रिवेणीसंगमात आत्मविर्सजन केलेले जीवन श्रीनिवृत्तिनाथांच्या चिंतेचा व चिंतनाचा विषय झाला होता. त्यापूर्वीच श्रीगुरु गहिनिनाथांच्याकडून त्र्यंबकेश्वरी

मिळालेल्या आध्यात्मिक प्रबोधनात श्रीनिवृत्तिनाथांनी आपल्या साऱ्या भावंडाना वाटेकरी करुन घेतले होते. म्हणूनच ***'ते आम्ही अविनाश अव्यक्त जुनाट'*** या निश्चयापर्यंत ते येवून थांबले होते.

- **निवृत्तिनाथांचे आत्मचिंतन : सत्याच्या वेदीवरील बलिदान :-**

पारंपरिक अशा समाजव्यवस्थेच्या बाहेर राहून आणि पारंपरिक अशाच धार्मिक व आध्यात्मिक व्यवस्थेच्याही बाहेर राहून वडिलांनी जी साधना आजन्म केली, तिनेच त्यांना शारीरिक दृष्टया आत्मदंडाची आवश्यकता जाणवून दिली. त्यांची ही कृती म्हणजे ***'स्वत:च क्रूसावर चढणे'*** होते. आपल्या मुलांच्या माध्यमातून चिन्मय शक्तीचा मुक्त आविष्कार व्हावा आणि त्या आविष्कारातून सत्याचा प्रकाश सर्व मानवांना प्राप्त व्हावा या हेतूनेच त्यांनी हे देहान्त प्रायश्चित्त स्वीकारले. आपल्या वडिलांनी सत्याच्या वेदीवर जे बलिदान केले. त्याचा परिणाम म्हणजे आपले सर्वांचे पवित्र जीवन आहे. याची खात्री पटल्यानेच श्रीनिवृत्तिनाथ बोलू लागले.

***"नाही जाति कुळ वर्ण अधिकार /***
***क्षेत्री वैश्य शुद्र द्विज नव्हे /***
***नव्हो देवगण यक्ष ना किन्नर /***
***ते आम्ही अविनाश अव्यक्त जुनाट /***
***निजबोधे इष्ट स्वरुप माझे //"*** ०४

RESEARCH JOURNEY

- **दाहक अनुभवसृष्टी आणि निवृत्तिनाथांची कृपादृष्टी**

देहान्त प्रायश्चितामुळे निवृत्तिनाथांच्या आई वडिलांचा प्रश्न जरी दु:खद रीतीने का होईना सुटला असला तरी लोकदृष्ट्या या अजाण बालकांचा प्रश्न अनुत्तरीच होता. सर्वात ज्येष्ठ श्रीनिवृत्तिनाथांनी आळंदीकर ब्रह्मवृदानांना प्रश्न विचारला ***'महाराज आता आम्हाला गती काय ?'*** त्यावर त्यांना पैठणहून शुध्दीपत्र घेऊन यावे म्हणजे आम्ही तुम्हाला आमच्या जातीत घेऊन. असे उत्तर मिळते. जन्मत:च शांत, दांत आणि प्रशांत अशा स्थितप्रज्ञ अवस्थेतील श्रीनिवृत्तिनाथ श्रीगुरुगहिनिनाथांच्या कृपाप्रसादाने नामरुपातित आपपरतेच्या पलिकडे गेलेले म्हणूनच ***'नव्हे मी सगुण / नव्हे मी निर्गुण//'*** असे उद्गार काढतात. लौकिकदृष्ट्या मिळणाऱ्या शुध्दीपत्राची त्यांना गरज वाटत नाही. पण आपले दु:ख देखील इतरांना अमृतमय व्हावे अशी व्यापक व सर्वस्पर्शी जीवनदृष्टीचे श्रीनिवृत्तिनाथ पुढे ज्ञानदेवांकरवी चैतन्याचे गाणे गातात. ***"सन्याशाच्या मुलांचा व्रतबंध करण्यास मान्यता देणारा शास्त्राधार धर्मपीठाला मिळतच नाही' सारे स्थितप्रज्ञवृत्तीने अनुभवनारे श्रीनिवृत्तिनाथ 'वर्णाश्रमधर्माची शब्दप्रामाण्यवादी चौकट किती बळकट आणि***

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

***जाचक आहे "***[०५] या विचाराने चिंताक्रांत होतात. येथे त्यांच्या वैयक्तिक उध्दाराचा प्रश्न नव्हताच मुळी ! पण आत्मज्ञानावाचून वंचित झालेल्या सहस्रावधी सामान्यांच्या जीवनास आधार मिळवून दिला पाहिजे याची आवश्यकता त्यांच्या मनाला भाराक्रांत करताना दिसते.

- **निवृत्तिनाथांचे लोकोत्तर कार्य : शिवभक्तीला कृष्णभक्तीची जोड :-**

नाथपरंपरेत भक्तीला फारसे स्थान नाही. योगसाधना हीच येथे महत्त्वाची. येथे कुंडलिनी जागृतीचा योग महत्त्वाचा. श्रीगुरुगहिनीनाथ हे श्रीगुरुगोरक्षनाथाचे शिष्य. त्यांनी नाथपरंपरेला अनुसरुन योगसाधनातर केलीच पण त्यांच्या अंतःकरणात मुळातच कृष्णभक्ती मुरलेली होती. अंतःकरणात सतत परमात्मप्रेमाचा ओलावा राहावा म्हणून आपल्या पूर्वीच्या कृष्णभक्तीची जोड या नाथपरंपरेच्या शिवोपासनेला दिली. हाच वारसा गुरु परंपरेने श्री निवृत्तिनाथांच्याकडे आला असल्याने शिव आणि कृष्ण हे विठ्ठलरुपात साकार झाले.[०६]

***'निवृत्ति गहिनी कृपा केली पूर्ण |***
***कुळ हे पावन कृष्ण नामे ||"*** [०७]

श्रीगहिनिनाथ - श्रीनिवृत्तिनाथ-श्रीज्ञानदेव ही महाराष्ट्रातील एकनाथ परंपरा कृष्ण-विठ्ठल भक्तीच्या रुपाने महाराष्ट्रात वारकऱ्यांच्या विठ्ठलभक्तांशी समन्वित झाली आहे.

- **धर्म जागो निवृत्तिचा :-**

***'गहिनीप्रसाद निवृत्तिदातार |***
***ज्ञानदेवा सार चोजविले ||'***

श्रीगुरु निवृत्तिनाथांनी ***'आत्मानात्मऐक्य ब्रह्मज्ञान'*** श्रीज्ञानदेवांना कृपाकरुन दिले कारण ब्रह्मगिरीच्या कुशीत श्रीगुरुगहिनीनाथांनी जेव्हा श्रीनिवृत्तिनाथांना ***'तत्त्वमसि'*** महावाक्याचा बोध केला आणि तो तात्काळ श्रीनिवृत्तिशी फलद्रूप झाला तेव्हाचं 'निवृत्तिनाथा, हे ब्रह्मज्ञान-शांभवीज्ञान तू विधीपूर्वक श्रीज्ञानदेवांना द्यावेस अशी श्रीगुरु गोरक्षनाथांची आज्ञा आहे " हे गहिनिनाथांचे आदेशात्मक मार्गदर्शन पुढे श्रीनिवृत्तिनाथांनी ज्ञानेदवांना उपदेशित केले तेव्हा ***"श्रीज्ञानदेवांनी या अवसेच्या रात्री प्रकाशाचे गाणे गायिले. त्यांनी ज्ञानाला संप्रदायाच्या कोठडीतून मुक्त केले. परमार्थाला प्रपंचाचे सौंदर्य प्राप्त करुन दिले. विराग अनुरागाच्या अधिष्ठानावर उभा केला. कर्मे ज्ञानदृष्टीने 'डोळस' बनविली आणि साधनेचे जीवनातील स्थान व्यवहार्य बनविले. "*** [०८]

***"सांप्रदायिकतेचा स्वीकार नकरता त्यांनी अद्वैत आणि भक्ती, वैराग्य आणि प्रापंचिकता, ज्ञानयोग आणि कर्मयोग यांचा संगम घडवून आणून महाराष्ट्राच्या कोणत्याही कठीण मार्गाचा उपदेश न करता परंपरेवर***

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

***फार मोठा आघात न करता, परंपरेची कठोर दृढता दूर करुन महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सामाजिक जीवनाला त्यांनी नवेवळण लाविले."*** [९]

**तात्पर्य :-** समाजाची आत्मिक धारणाच जेव्हा उध्वस्त होते, तेव्हा नव्या वाटा चोखळल्या जातात. लोकोत्तर विभूतीमत्त्वाचे संत निवृत्तिनाथ आणि त्यांची नाथपरंपरा यांनी लोकोध्दाराच्या नव्या वाटा चोखाळल्या. शिवभक्तीला कृष्णभक्तीची जोड दिली आणि वारकरी पंथाचा श्रीविठ्ठल समन्वयवादाचे तत्त्व बनला. ब्रह्मज्ञान कोणाची मक्तेदारी राहिली नाही. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि धार्मिक जीवनात ऐक्यभाव, सामरस्य, आले. जातिसंस्थेचा चिवटपणा आणि पढिक पांडित्याच्या शृंखला गळाल्या. श्रीगुरु निवृत्तिनाथांच्या कृपेने ज्ञानदेव क्रांतिदर्शी कवी तर झालेच पण एक युगपुरुष, तत्त्वदर्शी क्रांतीकारक संत म्हणून दिशादर्शक झाले आहेत.

- **संदर्भ ग्रंथ -**

१. बावकर रमेश ***'ज्ञान तेच देव'*** मुद्रक- कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि.पुणे ३०, तेरावी आवृत्ती, पृ.८

२. तत्रैव. पृ.९

३. मंचरकर र.बा.(संपा.) ***'श्री.ज्ञानेश्वर : अध्याय एक,'*** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुनर्मुद्रण २००५, पृ.१ व २

४. डॉ.ढेरे रा.चि. ***'सकलसंतगाथा'*** गाथपंचक, खंड-२

५. डॉ.मंचरकर र.बा, उनि.पृ.२३

६. प्रा.गोसावी र.रा. ***'श्रीनिवृत्तिनाथ चरित्र'*** सारथी प्रकाशन पुणे ३०, जून २०११, पृ.३०

७. तत्रैव, पृ८

८. डॉ.मंचरकर र.बा, उनि, पृ.२३

९. गाडगीळ स.रा, ***'ज्ञानेश्वरी : बारावा अध्याय'*** सिटीबुक स्टॉल, पुणे, १९६०, पृ.७, ८, २